ePaper
सोलापुरात भीषण अग्नितांडव, 8 जणांचा मृत्यू, मृतांच्या कुटुंबांना 5 लाखांची मदत
वर्ष - 8 । अंक - 284 | UDYAM-MH-26-0158827





# महाईन्यूज ™



**आतील पानांत**
- दिल्लीत साईची सुंदर खेळी!
- रॉयल्सवर किंग्ज पडले भारी!
- व्योमिका सिंग यांच्यावर आक्षेपार्ह विधान
- काँग्रेस तुमचा अपमान करतंय का?


www.mahaenews.com | सोमवार, दि. 19 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## भारताचा झटका, बांगलादेशला फटका

# आता बांगलादेश ‘रडार’वर !

## बांगलादेशातून आयात होणाऱ्या 42 टक्के वस्तूंवर बंदी : हिंदूंवरील अत्याचाराचा असाही बदला !

। नवी दिल्ली / ढाका । प्रतिनिधी । महाईन्यूज

**पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात उचललेले ‘ऑपरेशन सिंदूर’ चे पाऊल आणि त्याचे परिणाम सर्व शेजारील राष्ट्रे भोगत असतानाच भारताशी असहकार्य करणाऱ्या आणि चीनची सलोख्याचे संबंध जोडणाऱ्या बांगलादेशला झटका देण्याचे भारताने ठरविले आहे. त्याचा त्यांना मोठा फटका बसणार आहे.**




### बांगलादेशची अर्थव्यवस्था मंदीच्या दिशेने...

सध्याची आर्थिक अवस्था पाहता, पाकिस्तानप्रमाणेच बांगलादेशची अर्थव्यवस्थाही मंदीच्या गर्तेत चालली आहे. याला तोंड देण्यासाठी, बांगलादेशने अलीकडेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे हात पसरले आहेत. त्यांनी या नाणेनिधीकडे ७६२ दशलक्ष डॉलर्सची मदत मागितली आहे. जी सुमारे सहा हजार ३६० कोटी रुपयांची आहे. ही मदत मिळवण्यापूर्वी बांगलादेशला बरीच कागदपत्रे आणि करार करावे लागणार आहेत.

### तुर्कस्तान, अझरबैजान, आता बांगलादेश...

तुर्की, अझरबैजान पाठोपाठ आता भारताच्या रडारवर बांगलादेश आहे. बांगलादेशातून आयात होणाऱ्या बेचाळीस टक्के वस्तूंवर भारताने बंदी घातली असून या ‘ट्रेड स्ट्राईक’ मुळे बांगलादेशच्या नाकी नऊ येणार आहेत. बांगलादेशने थेट पाकिस्तानला मदत केली, नसली तरी त्यांच्या देशातील हिंदूंचा मात्र छळ मांडला आहे आणि त्यांची सगळी धोरणे ही चीनला पूरक अशीच आहेत.

### ट्रेड स्ट्राईक आणि खेळ खल्लास..

बांगलादेशाबरोबर मोठा व्यापार भारताने रोखला तरी त्यांचे कंबरडे मोडणार आहे. राजकीय परिस्थितीमुळे आधीच पिचलेला बांगलादेश आणि तेथील नागरिक आर्थिक आघाडीवर जेरीस येणार आहेत. यावर पर्याय म्हणून त्यांनी चीनशी संधान बांधले आहे. तथापि, भारताचा वार एवढा मोठा आहे, की बांगलादेश पुढे आता लोटांगण घालण्याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक राहणार नाही.

### भारताचे आक्रमक व्यापार धोरण..

बांगलादेश बाबत आता भारताने अत्यंत आक्रमक व्यापार धोरण आखले असून थेट आयात - निर्यात धोरण बदलले जाणार आहे. आयातीत ४२ टक्के कपात केली गेली, तरी तब्बल ६६ हजार कोटी रुपयांचे त्यांचे नुकसान होणार आहे, असे व्यापारी संघटनांनी सांगितले.

### नेमके प्रकरण काय आहे?

भारताने बांगलादेशातून आयात होणाऱ्या ४२ टक्के वस्तूंवर बंदी घातली आहे, तर त्यांची ही अवस्था झाली. पूर्ण आयातच बंद केली, तर काय होईल याचा विचार आता बांगलादेशने करायचा आहे. भारताच्या या कठोर निर्णयामुळे बांगलादेशला अंदाजे ७७० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स म्हणजे सुमारे ६६ हजार कोटी रुपयांचा झटका बसणार आहे.

### आंतरराष्ट्रीय संघटनेला चिंता

‘ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह’ या आंतरराष्ट्रीय संघटनेने काढलेल्या निष्कर्षानुसार, हे दोन्ही देशांच्या आयातीच्या आधारे धरलेले नुकसान आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाच्या निर्देशांनंतर जारी केलेल्या या बंदीमुळे भारत आता बांगलादेशातून काही वस्तू कमी प्रमाणात आयात करेल. भारताने उचललेले हे पाऊल बांगलादेशला आर्थिक संकटात घेऊन जाईल, असा अंदाजही या संघटनेने व्यक्त केला आहे.

### बांगलादेशच्या वस्त्र निर्यातीवर परिणाम..

भारत सरकारने उचललेल्या या पावलामुळे, आता बांगलादेशातून फक्त तयार कपडे, प्रक्रिया केलेले अन्न आणि प्लास्टिकच्या वस्तू यासारख्या गोष्टी काही विशिष्ट बंदरांमधून भारतात येऊ शकतील. काही वस्तूंच्या जमिनीवरून भारतात प्रवेशाला पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.

उदाहरण द्यायचे झाले तर, बांगलादेशातून दरवर्षी आयात होणारे सुमारे ६१८ दशलक्ष डॉलर किमतीचे तयार कपडे आता फक्त कोलकाता आणि ‘जेएनपीटी’ बंदरांमधूनच येऊ शकतील.

### जमिनीवरून वाहतूक शक्य

पूर्वी, हे कपडे जमिनीच्या मार्गानेही भारतात आणले जात होते. अशा परिस्थितीत, बांगलादेशच्या भारतातील कपड्यांच्या निर्यातीवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.

### भारताने का घेतला निर्णय?

‘जीटीआरआय’ च्या अहवालात म्हटले आहे की, भारताने हे पाऊल एकट्याने उचललेले नाही, तर ते बांगलादेशने केलेल्या कारवाईला दिलेले प्रत्युत्तर आहे. बांगलादेशने २०२४ च्या अखेरीस अनेक भारतीय वस्तूंच्या आयातीवर बंदी घातली आहे.

# पाकव्याप्त काश्मीर भारताकडे द्यावा!

## अन्यथा युद्ध अटळ, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे मत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पाकिस्तानव्याप्त काश्मीर (पीओके) भारतात विलीन होणे गरजेचे आहे, तरच दहशतवादी कारवाया थांबतील. त्यासाठी पाकिस्तानने पुढाकार घेऊन संबंधित भूभाग भारताकडे विलीन करावा अन्यथा युद्ध अटळ आहे,’ असे मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी रविवारी पुण्यात व्यक्त केले. शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत आठवले बोलत होते. रिपब्लिकन पक्षाचे राज्य सचिव बाळासाहेब जानराव, प्रदेश संघटक सचिव परशुराम वाडेकर आणि इतर पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.**



आठवले म्हणाले, ‘भारतात होणारे दहशतवादी हल्ले, कारवाया पाकव्याप्त काश्मीरमधूनच होत आहे. सातत्याने होणाऱ्या कारवाया पाकिस्तानमधूनच होत असल्याचे सिद्ध होत असल्याने, भारताकडून पाकिस्तानला ‘ऑपरेशन सिंदूर’च्या माध्यमातून दाखवून दिले आहे. त्यामुळे पाकिस्तानने काश्मीरमधील व्यापलेला भूभाग (पीओके) भारताकडे सोपवावा आणि दहशतवादी कारवाया थांबवाव्यात, असा प्रस्ताव भारताने मांडला आहे.’‘अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीनंतर युद्ध थांबले, असे सांगितले जात असले, तरी तसे नसून, भारताकडूनच युद्धविराम देण्यात आला आहे. भारताला कोणत्याही मध्यस्थाची गरज नाही,’ असे आठवले यांनी नमूद केले.उद्धव आणि राज ठाकरे पुन्हा एकदा एकत्र येण्याची शक्यता वाटत नाही. त्यांच्यात मतभेद आहेत. जर ते एकत्र आले, तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार) राज ठाकरेंना महाविकास आघाडीमध्ये स्वीकारेल, याची शाश्वती नाही. तसेच, शरद पवार २०१४ मध्येच पंतप्रधान नरेंद्र मोदींबरोबर आले असते, तर आज ते राष्ट्रपती झाले असते,’

### कोणत्याही मध्यस्थाची गरज नाही

त्यामुळे पाकिस्तानने काश्मीरमधील व्यापलेला भूभाग (पीओके) भारताकडे सोपवावा आणि दहशतवादी कारवाया थांबवाव्यात, असा प्रस्ताव भारताने मांडला आहे.’‘अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीनंतर युद्ध थांबले, असे सांगितले जात असले, तरी तसे नसून, भारताकडूनच युद्धविराम देण्यात आला आहे. भारताला कोणत्याही मध्यस्थाची गरज नाही,’ असे आठवले यांनी नमूद केले.उद्धव आणि राज ठाकरे पुन्हा एकदा एकत्र येण्याची शक्यता वाटत नाही. त्यांच्यात मतभेद आहेत. जर ते एकत्र आले, तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार) राज ठाकरेंना महाविकास आघाडीमध्ये स्वीकारेल, याची शाश्वती नाही. तसेच, शरद पवार २०१४ मध्येच पंतप्रधान नरेंद्र मोदींबरोबर आले असते.

अशी टिप्पणी आठवले यांनी केली.‘स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक महायुतीने एकत्र लढविण्याबाबत आरपीआयची तयारी आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची भेट घेणार आहे. पुण्यात पक्षाला १५ ते १६ जागा मिळणे अपेक्षित आहे.’ महापौरपदाचे आरक्षण अनुसूचित जातीसाठी सोडल्यास अडीच वर्षे महापौर पदासाठी मागणी या वेळी आठवले यांनी केली. आठवले यांनी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली ‘भारतात होणारे दहशतवादी हल्ले,सातत्याने होणाऱ्या कारवाया पाकिस्तानमधूनच होत असल्याचे सिद्ध होत असल्याने, भारताकडून पाकिस्तानला ‘ऑपरेशन सिंदूर’च्या माध्यमातून दाखवून दिले आहे.

# वाहनांमुळे दर वर्षी हजारो नागरिक आजारी पडतात

## देशभरात वर्षाला एक लाख 70 हजार लोकांचा जीव जातो

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘वाहतूक कोंडी असलेल्या शहरांमध्ये पुणे अव्वल स्थानी आहे. वाढलेल्या वाहन संख्येमुळे प्रदूषणात वाढ झाली असून त्याचा आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. देशात वर्षाला २१ लाख, तर पुण्यात साडेतीन हजार नागरिकांना हवेच्या प्रदूषणापासून होणाऱ्या आजाराचा सामना करावा लागत आहे, असे मत ‘परिसर’ संस्थेचे कार्यकारी संचालक आणि वाहतूक अभ्यासक रणजित गाडगीळ यांनी व्यक्त केले. ‘रस्ते अपघातात देशभरात वर्षाला एक लाख ७० हजार लोकांचा जीव जातो.**

तर पाच लाख लोकांना गंभीर दुखापत होते. पुण्यात दररोज एका



व्यक्तीचा रस्ते अपघातामध्ये मृत्यू होतो,’ याकडे त्यांनी लक्ष वेधले. वक्तृत्वोत्तेजक सभेतर्फे आयोजित ‘वसंत व्याख्यानमाले’मध्ये ‘शहर वाहतूक-आव्हाने आणि पुढील मार्ग’ या विषयावर रणजित गाडगीळ यांचे व्याख्यान झाले. त्या प्रसंगी ते बोलत होते. गाडगीळ म्हणाले, ‘रस्ते, उड्डाणपूल बांधून वाहतूककोंडी सोडविणे म्हणजे पेट्रोल टाकून आग विझविण्यासारखे आहे. पायाभूत सुविधा वाढल्यानंतर वाहनांची संख्या वाढते. त्यामुळे उड्डाणपूल बांधून आणि रस्ते वाढवून वाहतूककोंडी सुटत नाही, तर ती वाढत जाते. वाहतूक कोंडी हा प्रश्न तांत्रिक नसून, सामाजिक आहे. हा प्रश्न सोडवायचा असेल, तर शहराची वाहतूक रचना वाहनकेंद्री नव्हे तर, नागरिककेंद्री असणे महत्त्वाचे आहे.सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करून खासगी वाहनांची संख्या कमी करणे हा वाहतूक कोंडीवरचा उत्तम पर्याय आहे. रस्त्यांवरील वाहने कमी झाली की, बरेच प्रश्न सुटतात, याकडे गाडगीळ यांनी लक्ष वेधले. ते म्हणाले, ‘पुण्यामध्ये आतापर्यंत पीएमपी ही एकमेव सार्वजनिक वाहतूक व्यवस्था होती. मात्र, मागील चार वर्षांत पीएमपी बसची संख्या केवळ

### शहर नियोजनाचा फटका

हा चुकीच्या शहर नियोजनाचा फटका असल्याचे गाडगीळ यांनी सांगितले.पुण्यात २००५ मध्ये वाहनांची संख्या आठ लाख होती. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे २०१५ मध्ये झालेल्या नोंदणीनुसार शहरातील वाहनांची संख्या २३ लाख इतकी होती. मात्र, २०२५ मध्ये नोंदणीकृत वाहनांची संख्या ४१ लाख इतकी झाली आहे.

पन्नास बसने वाढली असून प्रवासी संख्येतही घट झाली आहे’, याकडे लक्ष वेधून गाडगीळ म्हणाले, ’एक लाख लोकसंख्येमागे ५० बस असे सक्षम सार्वजनिक वाहतुकीचे सूत्र आहे. मात्र, पुण्यात ही संख्या निम्म्याने कमी आहे. त्यामुळे लोक सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्यापासून परावृत्त होतात. परदेशात एका मोटारीला घर, कार्यालय आणि मॉल अशा तीन ठिकाणी वाहन लावण्याच्या जागा असतात. वाहन वापरू नये यासाठी काही करावे लागेल. युरोपियन देशांमध्ये पार्किंगचे दर भरमसाट असतात. पुणे हे देशातील एकमेव शहर आहे, की जिथे लोक रस्त्यावर कोणत्याही वेळी विनाशुल्क गाडी लावतात. अशा गाड्यांमुळे रस्त्यांवरची जागा अडली जाते. परिणामी वाहतूक कोंडीत भर पडते.’ नागरिकांसाठी असलेला शहराचा मध्य भाग आता वाहनांचा झाला आहे. सायकलींचे शहर अशी ओळख असणारे पुणे आता जगातील प्रदूषित आणि वाहतूक कोंडीचे शहर म्हणून ओळखले जात आहे.

## महापालिकेचे अधिकारी भ्रष्ट, सिंह यांच्याकडून सडकून टीका

# नदी सुधार प्रकल्प थांबवा!

## अन्यथा निम्मे शहर पाण्याखाली जाईल - जलपुरुष राजेंद्र सिंह

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुळा नदीत सुरु असलेल्या नदी सुधार प्रकल्पाच्या कामाला परवानगी देतील पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाने शहराची जीवनदायी असलेल्या नदीवर एक प्रकारे अन्याय केला आहे. यासाठी निळी पूररेषा बदलण्यात आली असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जाते. मात्र केवळ कागदावर निळी पूररेषा बदलून चालणार नाही. नदीने तिची निळी रेषा बदललेली नाही. मुळा नदी पात्रात खोलपर्यंत भराव टाकण्यात आलेला आहे. यामुळे यंदा जोरदार पाऊस झाला तर निम्मे शहर पाण्याखाली जाईल अशी भीती जलपुरुष राजेंद्र सिंह यांनी व्यक्त केली आहे.**



राजेंद्र सिंह यांनी मुळा नदीत सुरु असलेल्या नदी सुधार प्रकल्पाची रविवारी (१८ मे) सकाळी पाहणी केली. त्यानंतर त्यांनी चिंचवड येथे पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी सारंग येदवाडकर, नरेंद्र चुघ, विजय परांजपे, धनंजय शेडबाळे आदी उपस्थित होते.

राजेंद्र सिंह म्हणाले, नदीच्या पात्रात ७५ फूट आतमध्ये भराव टाकण्यात आला आहे. सिंचन विभागाने हे काम थांबवा अन्यथा पूर येईल, असे सांगितले आहे. पिंपरी-चिंचवड मनपाने नदीमधील एक लिटर देखील पाणी शुद्ध केलेले नाही. नदी सुधार योजनेच्या कामासाठी केवळ आकडे वाढवले जात आहेत. स्वच्छ सुंदर नदी पिंपरी-चिंचवड मधील नागरिकांना पाहायची आहे. नदी पात्रात केल्या जाणाऱ्या कामाला खरी परवानगी नदी देते. पावसाळ्यात नदीला पूर आल्यानंतर पालिकेकडे कथित परवानगीचा असलेला एक कागद हा पूर थांबवू शकणार नाही. हा परवानगीचा कागद भ्रष्टाचाराचा कागद असल्याची टीका जलपुरुष राजेंद्र सिंह यांनी केली. राजकीय नेते, प्रशासनातील अधिकारी आणि कंत्राटदार हे त्रिकुट झाले आहे. हे त्रिकुट न्यायालयाचे देखील ऐकत नसल्याचा घणाघात त्यांनी प्रशासनावर केला.या कामासाठी नागरिकांचा तीव्र विरोध आहे. पर्यावरणाची हानी होत आहे. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाने यात हस्तक्षेप करून योग्य निर्णय देणे गरजेचे असल्याचे देखील राजेंद्र सिंह म्हणाले.

### 17 जून रोजी सुनावणी

शहरातील अधिकारीच कंत्राटदार झाले आहे. अधिकारी कंत्राटदार झाल्यानंतर ते भ्रष्टाचार करतात. अधिकारी ठेकेदार झाले तर शहराचे वर्तमान आणि भविष्य धोकादायक होते. पिंपरी-चिंचवडचे आयुक्त शेखर सिंह आपले काम व्यवस्थित करत नाहीत. त्यांना नदी, पुणे आणि पिंपरी-चिंचवड मधील जनता आणि भारताचे संविधान शिक्षा देईल. संविधानानुसार ते काम करत नाहीत. याबाबत आम्ही सर्वोच्च न्यायालय आणि हरित लवाद येथे दाद मागत आहोत. मुळा नदीत पूर्वी एक भिंत बांधण्यात आली आहे. त्या भिंतीपासून ७५ फूट आतमध्ये आता आणखी एक भिंत बांधून तिथपर्यंत माती टाकण्यात आली आहे. या दोन्ही भिंती निळ्या पूर रेषेत आहेत. त्यामुळे मुळा नदीला पूर येईल. ते थांबवणे गरजेचे आहे. याबाबत न्यायालय काही वर्षांनी निर्णय देईल आणि मनपाला नदीमध्ये टाकलेली माती पुन्हा काढावी लागेल. निळी पूररेषा बदलण्यात आली असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जाते. मात्र केवळ कागदावर निळी पूररेषा बदलून चालणार नाही. नदीने तिची निळी रेषा बदललेली नाही. आम्हाला नदीमधील काम मान्य नाही. आम्ही राष्ट्रीय हरित लवादात याबाबत तक्रार केली आहे. याप्रकरणी १७ जून रोजी सुनावणी होणार आहे.

### मागणीकडे दुर्लक्ष अन नऊ वर्षानंतर कारवाई

शहरातील पर्यावरण प्रेमींनी सन २०१६ मध्ये इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेत होणाऱ्या बांधकामांना थांबवण्याची पिंपरी-चिंचवड मनपा कडे मागणी केली होती. मात्र पालिकेने त्यावेळी त्याकडे दुर्लक्ष केले. नुकताच न्यायालयाने आदेश देत ३१ मे पर्यंत इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेतील बांधकामे पाडण्याचे आदेश दिले. त्यानुसार पिंपरी-चिंचवड मनपाने मागील दोन दिवसांखाली कारवाई करत निळ्या पूररेषेतील ३६ बंगल्यांवर कारवाई केली. यामध्ये नागरिकांचे मोठे नुकसान झाले. नऊ वर्षांनंतर ही कारवाई करण्यात आली. आमच्या मागणीकडे वेळीच लक्ष दिले असते तर आज तिथल्या नागरिकांवर ही वेळ आली नसती.

### महायुतीमुळे काम पुन्हा सुरु

महाविकास आघाडी सरकार असताना ज्येष्ठ नेते शरद पवार, तत्कालीन पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, राज्यसभा खासदार वंदना चव्हाण यांनी मुंबई मध्ये नदी सुधार प्रकल्पाची माहिती घेण्यासाठी एक बैठक घेतली. त्या बैठकीत पर्यावरण प्रेमींनी सरकारला या प्रकल्पातील चुका लक्षात आणून दिल्या. त्यामुळे त्यावेळी या प्रकल्पाचे काम तात्काळ थांबवण्यात आले. त्यावेळी शरद पवार यांनी हा प्रकल्प होऊ देणार नसल्याचे स्पष्टपणे सांगितले होते. मात्र राज्यात महायुतीचे सरकार येताच या नदी सुधार प्रकल्पाच्या कामाला पुन्हा सुरुवात झाली असल्याचे राजेंद्र सिंह यांनी सांगितले.

---

# निगडीतील हरित सेतू प्रकल्पाला विरोध!

## नागरिकांची बैठक; प्रशासनाच्या निर्णयाविरोधात आक्षेप

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरवासियांना निवासस्थानापासून जवळचे मेट्रो, बसस्थानक, शाळा, महाविद्यालये, बँका आदी ठिकाणी कामानिमित्त पायी जाणे सहज शक्य व्हावे, यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका 'हरित सेतू' प्रकल्प राबविणार आहे. मात्र या प्रकल्पाला विरोध केला जात आहे.**






निगडी प्राधिकरणामध्ये हरित सेतू हा प्रकल्प सुरू असून या प्रकल्पामुळे प्राधिकरणामध्ये भविष्यात येणाऱ्या समस्या अडचणी या विषयावर प्रकल्पाला विरोध व काही उपाययोजना सुचवण्यासाठी रविवारी (दि 18) बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये हरित सेतू संदर्भात चर्चा करण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने फुटपाथ मोठा केल्यास वाहतूक कोंडी होणार, फुटपाथ वर टपरीधारक, हातगाड्या येणार, सायकल ट्रॅक व वाहन पार्किंग बॉस्कमुळं होणारी वाहतूक कोंडी, फुटपाथवर बसण्यासाठी बाके बसवल्यामुळे अनैतिक प्रकार घडणार आहे.

प्राधिकरणातील रहिवासी भागात देखील हरित सेतू प्रकल्प राबवण्यात येणार आहे. गर्दीच्या ठिकाणी आणि रहिवासी भागात देखील एकच निर्णय लागू करण्यात आल्याबद्दल नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

बाबत प्रशासनाला हरकती देण्यात येणार असल्याचेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने »



### वृत्ती भगवंताच्या ठिकाणी स्थिर ठेवावी.

माझा देह परमार्थाच्या आड येतो हे म्हणणे खरे नाही. तो मदत करतो किंवा आड येतो, या दोन्हीत विशेष तथ्य मानू नये. माझी वृत्ती कुठे गुंतते हे पहावे. भगवद्भजनात दिवस घालवावा असे वाटू लागले, पण संगत मिळाली खेळ खेळणाऱ्याची. तेव्हा, त्याचे मन कशाला मोडा असे म्हणून खेळू लागला, भगवंताच्या स्मरणात राहण्याच्या वृत्तीपासून ढळू लागला, तर कसे होणार ? आईने आजवर खस्ता खाल्ल्या, लहानाचे मोठे केले, तीच आई लग्न झाल्यावर विषयाच्या आड येऊ लागली आणि म्हणून वैऱ्यासारखी वाटू लागली ! वास्तविक, दोघांच्याही देहांत फरक होण्यासारखे असे काहीच झाले नाही; पण वृत्तीत बदल झाला. विषयातच मी गुंतून राहू लागलो, याला काय करावे ? ' मी सुखी कशाने होईन ' हे आपण आपल्या कल्पनेनेच ठरवले; पण या जगात पूर्ण सुख किंवा पूर्ण दु:ख असे काही आहे का ? जे खरे असेल किंवा खोटे असेल याची आपल्याला खात्री नाही, त्या बाबतीत आपण रिकाम्याच कल्पना करीत बसतो. दुसरा मनुष्य ज्या वेळी आपल्याला त्रास देतो, त्या वेळी त्यामध्ये पन्नास टक्के आपली कल्पना असते. बाकी उरले पन्नास टक्के; त्याबद्दल ' त्याने दिलेला त्रास मी करून घेणार नाही ' ही वृत्ती असावी, म्हणजे संपले ! आपली वृत्ती सारखी बदलते आहे, आणि जगही सारखे बदलते आहे. त्यामुळे अमुक परिस्थितीमुळे सुख किंवा अमुक परिस्थितीमुळे दु:ख होते हे वाटणे खरे नव्हे, कारण सुखदु:ख अस्थिर असते. शास्त्रांचे नियम हे वृत्तीला स्थिर करतात. भजन, पोथीवाचन, मंदिर बांधणे, वगैरे गोष्टी जर वृत्ती सुधारण्यासाठी न केल्या तर ती नुसती करमणूक होते, त्यापासून खरा फायदा होत नाही. आगगाडी रोज काशीला जाते, पण तिला काही काशीयात्रा घडत नाही, विश्वेश्वराचे दर्शन, वगैरे आतल्या लोकांना घडते. त्याचप्रमाणे, देहाने नुसता पूजापाठ वगैरे करून परमार्थ घडत नाही. आपली वृत्ती भगवंताच्या ठिकाणी चिकटली पाहिजे. भगवंताचे रूप सारखे समोर ठेवता येणार नाही, पण त्याचे रूप लक्षात आले नाही तरी आपण त्याचे नाम घेतो हे लक्षात राहिले तर वृत्ती सुधारेल. आपल्या डोळ्यात अगदी बारीक कण गेला तरी तो खुपतो. त्याहीपेक्षा वृत्ती सूक्ष्म असते. ती भगवंतालाच कळते, म्हणून त्याच्यापाशी लबाडी चालत नाही.त्याच्यावर भगवंताची खरी कृपा झाली हे समजावे. भगवंतापासून वेगळे न राहणे, त्याच्या नामात राहणे, यांत खरे समाधान, शांती आणि सुख आहे.

बोधवचन:- वृत्ती स्थिर होणे, शांत होणे, याचे नाव समाधान, आणि भगवंताकडेच वृत्ती सारखी राहणे याचे नाव समाधि होय.

# उच्चशिक्षित घरभेदी गद्दारांची फौज, पाकड्यांचे गुप्तहेर, करतात मौज !



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**भारतात राहून, पाकड्यांची चाकरी करत भारताची गुपिते त्यांना देण्याच्या बदल्यात करोडो रुपये कमावणाऱ्या देशद्रोही गद्दारांची फौजच्या फौज कार्यरत असल्याचे पाहून मन अक्षरशः विषण्ण होते.**



### प्रतिष्ठित नागरिक म्हणून वावरतात..

दररोज सापडत असलेले हे महाभाग अत्यंत उच्चशिक्षित आहेत, समाजामध्ये एक प्रतिष्ठित नागरिक म्हणून वावरत आहेत आणि पाकिस्तानने फेकलेल्या काही पैशाच्या तुकड्याच्या बदलात देशद्रोहीपणा, घरभेदीपणा आणि गद्दारी करताना त्यांना किंचितही लाज वाटत नाही, ही गोष्ट खऱ्या अर्थाने चिंताजनकच म्हणावी लागेल.

### निमित्त 'यु ट्युब'र ज्योती मल्होत्राचे..

पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली युट्यूबर ज्योती मल्होत्राला अटक करण्यात आली आहे, त्यामुळे हा प्रश्न अचानक पडला आहे. शास्त्रज्ज्ञ प्रदीप कुरुलकर, पंकज शर्मा, अच्युतानंद मिश्रा, ध्रुव सक्सेना, माधुरी गुप्ता आणि आता ज्योती मल्होत्रा..देशद्रोही गद्दारांची ही काळीकुट्ट यादी यादी संपता संपेना !

### लाज कशी वाटत नाही..

इतर देशद्रोह्यांप्रमाणेच ज्योती मल्होत्रादेखील आतापर्यंत तीन वेळा पाकिस्तानला गेली आहे. पाकिस्तान गुप्तहेर संघटनेच्या अधिकाऱ्यांच्या समवेत किंवा त्यांच्या पैशाच्या जोरावर तिने अनेक देशांमध्ये भटकंती केली असल्याचे उघड झाले आहे, हे खरे आमचे दुर्दैव!

### पाकड्यांसाठी हेरगिरीचा थेट आरोप !

पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेली हिसारमधील न्यू अग्रसेन कॉलनीतील रहिवासी असलेली युट्यूबर ज्योती मल्होत्रा ही ३३ वर्षाची असून एका सामान्य घरातील मुलगी आहे. पण, विलासी जीवन जगण्याच्या सवयीने तिला देशविरोधी कारवाया करण्याची इच्छा झाली. ज्योतीला पैसे कमवण्याची इतकी तीव्र इच्छा होती. तिने नोकरी सुरू केली होती. पण, त्या तुटपुंज्या पगारावर तिचे समाधान होत नव्हते. या ठिकाणाहून तिचा सुरू झालेला प्रवास हा थेट पाकिस्तानची हेरगिरी करण्यापर्यंत पोहोचला.

### 'सोशल मीडिया' ची ताकद..

पैसे पुरत नाहीत हे लक्षात आल्यानंतर तिने सोशल मीडियावर व्हिडीओ बनवायला सुरुवात केली. त्यावेळी तिला 'सोशल मीडिया' ची ताकद लक्षात आली, आणि खऱ्या अर्थाने ती परिपक्व झाली. ज्योतीने यूट्यूब व्हीडिओ आणि ट्रॅव्हल ब्लॉगिंगमधून पैसे कमवायला सुरुवात केली, तेव्हा तिच्या आयुष्याला एक वेगळे वळण मिळाले. पैशांची चटक लागल्यावर मोठ्या गाड्यांमध्ये प्रवास करण्याची, प्रतिष्ठित नागरिक, उद्योगपती, व्यापारी अशा लोकांसोबत वेळ घालवण्याची, खाण्याची आणि पिण्याची आणि बँक खात्यात मोठी रक्कम दिसावी, यासाठी तिने कोणत्याही थराला जाण्याची हिंमत झाली.

### लाखो फॉलोअर्स हेच भांडवल..

ज्योतीचे 'ट्रॅव्हल विथ जो' नावाच्या चॅनलवर काही लाख फॉलोअर्स आहेत आणि इंस्टाग्रामवर १.३१ लाख फॉलोअर्स आहेत.ज्योती भारत आणि परदेशातील तिच्या प्रवासाशी संबंधित विशिष्ट ठिकाणांबद्दलच्या आठवणी आणि माहिती शेअर करते. ज्योतीचे असे अनेक व्हिडिओ आहेत, ज्यात तिने पाकिस्तानची सकारात्मक प्रतिमा दाखवली आहे.

### ज्योतीच्या मागे ससेमिरा..

हिसार पोलिसांनी पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या सहा जणांना अटक केली. यामध्ये युट्यूबर ज्योती मल्होत्रा आणि तिच्या पाच मैत्रिणींचा समावेश आहे. ज्योतीला हिसारमधील न्यू अग्रसेन एक्सटेंशन येथून अटक करण्यात आली. ज्योतीने २२ ऑक्टोबर २०१८ रोजी तिचा पासपोर्ट बनवला. त्यानंतरही तिने काम सुरू ठेवले. युट्युब चॅनेलनंतर तिने ट्रॅव्हल ब्लॉगिंग सुरू केले. या दरम्यान ती दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयातील कर्मचारी एहसान-उर-रहीम उर्फ दानिशच्या संपर्कात आली आणि अलगद हेरगिरीच्या जाळ्यात अडकली.

### पाकिस्तानची भेट महत्त्वाची..

तिने दानिशचा मोबाईल नंबर घेतला. दोघेही एकमेकांशी बोलू लागले. त्यानंतर तिने दोनदा पाकिस्तानला भेट दिली. 'आयबी' कडून मिळालेल्या माहितीनुसार, ज्योती दिल्लीहून एका शीख गटासह दोनदा पाकिस्तानला गेली आहे आणि एकदा एकटीच कर्तारपूरसाहिब गुरुद्वाराला भेट देण्यासाठी गेली होती. तिने दुबई, थायलंड, इंडोनेशिया, नेपाळ, भूतान, चीन, पाकिस्तान आणि बांगलादेशचाही प्रवास केला असल्याचे उघडकीस आले आहे.

### हेरगिरीचे बिंग फुटले..

दानिशच्या माध्यमातून ज्योतीने पाकिस्तानच्या हेरगिरी करणाऱ्या संस्थेची संधान बांधले. त्यांच्याशी अनेक वेळा गाठीभेटी घेऊन भारताची गुपिते त्यांच्यापर्यंत पोहोचवली. नंतर तिने भारतात राहूनच मोबाईलद्वारे तसेच सोशल मीडियाच्या अन्य प्लॅटफॉर्म द्वारे त्यांच्याशी संपर्क कायम ठेवला. ज्योतीचे बिंग फुटले आहे, त्यातून आता बरीच लफडी बाहेर पडतील.

### बापरे, केवढी ही देशद्रोह्यांची फौज!

ज्योती मल्होत्राच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही वर्षातील देशद्रोह्यांच्या यादीवर सहज नजर टाकली, तर प्रदीप कुरुलकर, पंकज शर्मा, अच्युतानंद मिश्रा, ध्रुव सक्सेना, माधुरी गुप्ता या उच्चशिक्षित घरभेदी गद्दारांची यादीच समोर येते. उच्चशिक्षित गद्दारांनी देशांशी केलेली गद्दारी चिंतेचा विषय त्यामुळेच वाटत आहे.

### लिंगपिसाट कुठले, 'हनी ट्रॅप' भोवले..

हेरगिरीच्या आरोपात सर्वात संवेदनशील अटक 'डीआरडीओ' चा वैज्ञानिक प्रदीप कुरुलकरची ठरली होती. मुलीच्या वयाच्या तरुणीशी चाळे करण्याच्या नादात प्रदीप कुरुलकरने थेट मिसाईल, ड्रोन आणि रोबोटिक्स प्रणालीची अत्यंत संवेदनशील माहिती पाकिस्तानला दिली होती. २०२० पासून ते आतापर्यंत अकरा नौसैनिकांसह १८ जणांना अटक करण्यात आली आहे. यामधील बहुतांश महिला एजंटच्या 'हनी ट्रॅप' मधून पाकिस्तानच्या गळाला लागले आहेत.

### यंदा आतापर्यंत पाच जणांना अटक

या वर्षात पाकिस्तानी हनी ट्रॅप आणि आयएसआयच्या जाळ्यात अडकून संवेदनशील माहिती देत गद्दारी करणाऱ्या पाच जणांना अटक करण्यात आली आहे. देशातील तपास यंत्रणांकडून भटिंडा पंजाबमधून रकीब खानला अटक करण्यात आली. तत्पूर्वी, मार्च महिन्यात सुनील कुमार रामला सुद्धा तेथून अटक करण्यात आली. त्याच्यावर युनिटची लोकेशन डिटेल्स पाठवल्याचा आरोप होता. मार्चमध्ये रविंद्र कुमार आणि शाहबाज खानला कानपूर पोलिसांनी अटक केली. या दोघांना नेहा शर्माच्या नावाने हनी ट्रॅप झाला होता.

### अकरा नौदल कर्मचारीही अटकेत..

डिसेंबर २०२० मध्ये आंध्र प्रदेश पोलिसांनी नौदलाच्या गुप्तचर विभागाशी संयुक्तपणे सहकार्य करत एका कथित हेरगिरी प्रकरणात अकरा नौदल कर्मचारी आणि दोन नागरिकांसह तेरा जणांना अटक केली होती. पाकिस्तानी आयएसआयच्या एजंटांनी सोशल मीडियावर त्यांना हनी ट्रॅपमध्ये अडकवले होते. २००७ मध्ये 'आयएफएस' अधिकारी माधुरी गुप्ताला अटक करण्यात आली होती.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# 17 खासदारांना संसदरत्न पुरस्कार!

## सुळेंसह राज्यातील सात खासदारांचाही होणार सन्मान

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**संसदेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १७ खासदार आणि २ संसदीय स्थायी समित्यांची संसदरत्न पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली आहे. हे पुरस्कार संसदेत सक्रिय सहभाग, वादविवादात सहभाग, प्रश्न विचारणे आणि कायदेविषयक कामात योगदान या आधारावर दिले जातात. हा पुरस्कार प्राइम पॉइंट फाउंडेशनने सुरू केला आहे.**

या वर्षीच्या विजेत्यांची निवड हंसराज अहिर (अध्यक्ष, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केली. ते म्हणाले की, लोकशाही बळकट करण्यासाठी संसदेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या खासदारांना हे पुरस्कार दिले जातात. १७ खासदारांना संसदरत्न पुरस्कार देण्यात आला असून त्यामध्ये ७ महाराष्ट्रातील खासदारांचा समावेश आहे.

संसदीय लोकशाहीमध्ये त्यांच्या उत्कृष्ट आणि शाश्वत योगदानाबद्दल चार खासदारांना विशेष सन्मानित केले गेले. प्राइम पॉइंट फाउंडेशनच्या मते, हे चार खासदार १६ व्या आणि १७ व्या लोकसभेत संसदेत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांपैकी एक आहेत आणि त्यांच्या सध्याच्या कार्यकाळातही ते सतत सक्रिय आहेत. भर्तृहरी महताब (भाजप), सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी-सपा), एन. ऑफ. प्रेमचंद्रन (आरएसपी), श्रीरंग आप्पा बारणे (शिवसेना) अशी या खासदारांची नावे आहेत. उर्वरित १३ खासदारांचीही त्यांच्या उत्कृष्ट संसदीय कार्यासाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये अनेक राजकीय पक्षांचे प्रतिनिधी समाविष्ट आहेत. या खासदारांनी संसदेत प्रश्न विचारून, चर्चेत भाग घेऊन आणि विधेयकांवर सूचना देऊन महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्मिता वाघ (भाजप), अरविंद सावंत (शिवसेना उद्धव ठाकरे गट), नरेश गणपत म्हस्के (शिवसेना), वर्षा गायकवाड (काँग्रेस), मेधा कुलकर्णी



(भाजप), प्रवीण पटेल (भाजप), रवी किशन (भाजप), निशिकांत दुबे (भाजप), विद्युत बरन महतो (भाजप), पी. पी. चौधरी (भाजप), मदन राठोड (भाजप), सी.एन. अन्नादुराई (द्रमुक), दिलीप सैकिया (भाजप) या खासदारांन संसदरत्न पुरस्कार देण्यात आला आहे.या वर्षी दोन संसदीय स्थायी समित्यांनाही संसदरत्न पुरस्काराने सन्मानित केले जाईल.भर्तृहरी महताब अध्यक्ष असलेले वित्त स्थायी समितीला हा पुरस्कार मिळाला असून या समितीने संसदेला आर्थिक धोरणांवरील अनेक प्रभावी आणि अभ्यासपूर्ण अहवाल सादर केले आहेत. तसंच, चरणजित सिंग चन्नी अध्यक्ष कृषी स्थायी समितीचीही दखल घेण्यात आली असून या समितीने शेतकऱ्यांच्या समस्या आणि कृषी सुधारणांवर ठोस सूचना संसदेत मांडल्या आहेत. संसदरत्न पुरस्कार २०१० मध्ये सुरू करण्यात आले आणि हे पुरस्कार पारदर्शकता, जबाबदारी आणि लोकशाही मूल्ये मजबूत करण्यासाठी संसदेत सक्रिय राहणाऱ्या खासदारांना दिले जातात. खासदारांना प्रोत्साहन देणे आणि लोकांमध्ये संसदीय कामकाज लोकप्रिय करणे हा त्याचा उद्देश आहे.या वर्षीच्या विजेत्यांची निवड हंसराज अहिर (अध्यक्ष, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग) यांच्या अध्यक्षतेखालील

### महताब स्थायी समितीला पुरस्कार

या खासदारांनी संसदेत प्रश्न विचारून, चर्चेत भाग घेऊन आणि विधेयकांवर सूचना देऊन महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्मिता वाघ (भाजप), अरविंद सावंत (शिवसेना उद्धव ठाकरे गट), नरेश गणपत म्हस्के (शिवसेना), वर्षा गायकवाड (काँग्रेस), मेधा कुलकर्णी (भाजप), प्रवीण पटेल (भाजप), रवी किशन (भाजप), निशिकांत दुबे (भाजप), विद्युत बरन महतो (भाजप), पी. पी. चौधरी (भाजप), मदन राठोड (भाजप), सी.एन. अन्नादुराई (द्रमुक), दिलीप सैकिया (भाजप) या खासदारांन संसदरत्न पुरस्कार देण्यात आला आहे.या वर्षी दोन संसदीय स्थायी समित्यांनाही संसदरत्न पुरस्काराने सन्मानित केले जाईल.भर्तृहरी महताब अध्यक्ष असलेले वित्त स्थायी समितीला हा पुरस्कार मिळाला.

समितीने केली. ते म्हणाले की, लोकशाही बळकट करण्यासाठी संसदेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या खासदारांना हे पुरस्कार दिले जातात. १७ खासदारांना संसदरत्न पुरस्कार देण्यात आला असून त्यामध्ये ७ महाराष्ट्रातील खासदारांचा समावेश आहे.

संसदीय लोकशाहीमध्ये त्यांच्या उत्कृष्ट आणि शाश्वत योगदानाबद्दल चार खासदारांना विशेष सन्मानित केले गेले. प्राइम पॉइंट फाउंडेशनच्या मते, हे चार खासदार १६ व्या आणि १७ व्या लोकसभेत संसदेत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांपैकी एक आहेत आणि त्यांच्या सध्याच्या कार्यकाळातही ते सतत सक्रिय आहेत. भर्तृहरी महताब (भाजप), सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी-सपा), एन. ऑफ. प्रेमचंद्रन (आरएसपी), श्रीरंग आप्पा बारणे (शिवसेना) अशी या खासदारांची नावे आहेत. उर्वरित १३ खासदारांचीही त्यांच्या उत्कृष्ट संसदीय कार्यासाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये अनेक राजकीय पक्षांचे प्रतिनिधी समाविष्ट आहेत.

# रत्नागिरी जिल्ह्यात नैसर्गिक शेती अभियान

## शेतकऱ्यांच्या पुढाकाराने 2600 हेक्टर जमीन पिकाखाली येणार

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**रत्नागिरी जिल्ह्यात शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी नैसर्गिक शेती अभियान राबविण्यात येत आहे. यासाठी ६५०० शेतकऱ्यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील २६०० हेक्टर पिकाखाली आणण्यात येणार आहे. हे अभियान डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे.**

जिल्ह्यात शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी नैसर्गिक शेती अभियान राबविण्यासाठी ५२ शेतकरी गट तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक गटात १२५ शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. हे नैसर्गिक शेती अभियान विषमुक्त शेतमाल उत्पादन या उद्देश्याने राबविण्यात येत आहे. कृषी विभाग व 'आत्मा' यांच्या प्रयत्नातून नैसर्गिक शेती अभियान राबविताना विषमुक्त अन्नधान्य उत्पन्नावर भर देण्यात आला आहे.शेतीतील रासायनिक खताचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेवून नैसर्गिक शेतीवर भर देण्यात आला आहे.

यासाठी शेतकऱ्यांचे गट तयार करण्यात येत असून, त्यासाठी शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.शाश्वत शेतीला चालना देणे, रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर कमी करणे, जमिनीचे आरोग्य सुधारणे जैवविविधतेला प्रोत्साहन देणे या उद्देश्याने डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियान राबविण्यात येत आहे. नैसर्गिक घटकाचा वापर करून



विषमुक्त शेतमाल तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी शेतकरी स्वतःहून तयार होत आहेत. या अभियानामुळे रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर न केल्यामुळे खर्च कमी होणार आहे. जमिनीचे आरोग्य सुधारणार आहे.

जैविक घटकांचा वापरामुळे मातीची सुपीकता वाढण्यास मदत होईल.जिल्ह्यातील जे शेतकरी किंवा त्यांचा गट नैसर्गिक शेती करण्यासाठी इच्छुक असतील त्यांनी मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी नैसर्गिक शेती अभियान राबविण्यासाठी ५२ शेतकरी गट तयार करण्यात आले आहेत.

### जमिनीचे आरोग्य सुधारणार

यासाठी शेतकऱ्यांचे गट तयार करण्यात येत असून, त्यासाठी शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.शाश्वत शेतीला चालना देणे, रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर कमी करणे, जमिनीचे आरोग्य सुधारणे जैवविविधतेला प्रोत्साहन देणे या उद्देश्याने डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियान राबविण्यात येत आहे. नैसर्गिक घटकाचा वापर करून विषमुक्त शेतमाल तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी शेतकरी स्वतःहून तयार होत आहेत. या अभियानामुळे रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर न केल्यामुळे खर्च कमी होणार आहे. जमिनीचे आरोग्य सुधारणार आहे. जैविक घटकांचा वापरामुळे मातीची सुपीकता वाढण्यास मदत होईल.जिल्ह्यातील जे शेतकरी किंवा त्यांचा गट नैसर्गिक शेती करण्यासाठी इच्छुक असतील त्यांनी मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.

प्रत्येक गटात १२५ शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. हे नैसर्गिक शेती अभियान विषमुक्त शेतमाल उत्पादन या उद्देश्याने राबविण्यात येत आहे. कृषी विभाग व 'आत्मा' यांच्या प्रयत्नातून नैसर्गिक शेती .शेतीतील रासायनिक खताचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेवून नैसर्गिक शेतीवर भर देण्यात आला आहे.

# व्योमिका सिंग यांच्यावर आक्षेपार्ह विधान!

## अशोका विद्यापीठाच्या फॅकल्टी असोसिएशनने दिली 'ही' प्रतिक्रिया



।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**जम्मू काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील तब्बल ९ ठिकाणी असलेल्या दहशतवादी तळांना उद्ध्वस्त करत मोठी कारवाई केली. या कारवाईत तब्बल १०० पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, ऑपरेशन सिंदूर राबवल्यानंतर ७ मे रोजी भारताच्या परराष्ट्र मंत्रालय आणि सुरक्षा दलाच्यावतीने पत्रकार परिषदेत कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी ऑपरेशन सिंदूरची माहिती दिली होती.**

पत्रकार परिषदेसंदर्भात हरियाणाच्या अशोका विद्यापीठातील सहयोगी प्राध्यापक आणि राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख अली खान महमुदाबाद यांनी आक्षेपार्ह विधान केल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणात हरियाणा पोलिसांनी आज त्यांना अटक केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात महिला आयोगाने देखील अली खान महमुदाबाद यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती.दरम्यान, अली खान महमुदाबाद यांना अटक करण्यात आल्यानंतर आणि त्यांनी केलेल्या वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर आता अशोका विद्यापीठाच्या फॅकल्टी असोसिएशनने प्रतिक्रिया देत त्यांचा बचाव केला आहे. एका निवेदनात प्राध्यापक संघटनेने प्राध्यापक अली खान महमूदाबाद यांच्या अटकेचा निषेध केला असून त्यांच्यावरील आरोप निराधार आणि असमर्थनीय असल्याचं म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.प्राध्यापक महमूदाबाद यांना ज्या छळाचा सामना करावा लागला आहे

त्याचा आम्ही निषेध करतो. त्यांना नवी दिल्लीतील त्यांच्या घरातून अटक केल्यानंतर त्यांना सोनीपत येथे नेण्यात आलं. त्यांना आवश्यक ती औषधे देखील दिली गेली नाहीत. त्यांच्या ठावठिकाणाबद्दल कोणतीही माहिती न देता तासन्तास फिरवण्यात आलं", असं निवेदनात म्हटलं आहे. प्राध्यापक संघटनेने त्यांच्या सहकाऱ्याला पाठिंबा देण्याचं आश्वासन दिलं आहे. तसेच प्राध्यापक महमूदाबाद हे विविध साहित्यिक आणि भाषिक परंपरांमध्ये पारंगत आहेत. दक्षिण आशिया आणि त्यापलीकडे इतिहास आणि राज्यशास्त्राचे एक तज्ज्ञ आणि अभ्यासक आहेत. त्यांच्या सर्व लेखनात शैक्षणिक आणि व्यापक सार्वजनिक मंचांवर त्यांनी न्याय, बहुलवाद आणि एकता यांचे महत्त्व अधोरेखित केलेले आहेत. ते नेहमीच संवैधानिक मूल्ये आणि नैतिकतेचा आदर करतात. तसेच आम्ही प्राध्यापक महमूदाबाद यांची तात्काळ सुटका करण्याची आणि त्यांच्यावरील सर्व आरोप मागे घेण्याची मागणी करत आहोत, असं निवेदनात म्हटलं आहे.पण त्या पत्रकार परिषदेसंदर्भात हरियाणाच्या अशोका विद्यापीठातील सहयोगी प्राध्यापक आणि राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख अली खान महमुदाबाद यांनी आक्षेपार्ह विधान केल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणात हरियाणा पोलिसांनी आज त्यांना अटक केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात महिला आयोगाने देखील अली खान महमुदाबाद यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती.अशोका विद्यापीठाच्या फॅकल्टी असोसिएशनने प्रतिक्रिया देत त्यांचा बचाव केला आहे. एका निवेदनात प्राध्यापक संघटनेने प्राध्यापक अली खान महमूदाबाद यांच्या अटकेचा निषेध केला असून त्यांच्यावरील आरोप निराधार आणि असमर्थनीय असल्याचं म्हटलं आहे.

### पाठिंबा देण्याचं आश्वासन

प्राध्यापक महमूदाबाद यांना ज्या छळाचा सामना करावा लागला आहे त्याचा आम्ही निषेध करतो. त्यांना नवी दिल्लीतील त्यांच्या घरातून अटक केल्यानंतर त्यांना सोनीपत येथे नेण्यात आलं. त्यांना आवश्यक ती औषधे देखील दिली गेली नाहीत. त्यांच्या ठावठिकाणाबद्दल कोणतीही माहिती न देता तासन्तास फिरवण्यात आलं", असं निवेदनात म्हटलं आहे. प्राध्यापक संघटनेने त्यांच्या सहकाऱ्याला पाठिंबा देण्याचं आश्वासन दिलं आहे. तसेच प्राध्यापक महमूदाबाद हे विविध साहित्यिक आणि भाषिक परंपरांमध्ये पारंगत आहेत. दक्षिण आशिया आणि त्यापलीकडे इतिहास आणि राज्यशास्त्राचे एक तज्ज्ञ आणि अभ्यासक आहेत.

# काँग्रेस तुमचा अपमान करतंय का?

## जेव्हा आपलं राष्ट्र असतं तेव्हा राजकारण महत्त्वाचं नसतं : शशी थरूर



।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील तब्बल ९ ठिकाणी असलेल्या दहशतवादी तळांना उद्ध्वस्त केलं. या कारवाईत १०० पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाल्याचं सांगण्यात येत आहे. दरम्यान, या 'ऑपरेशन सिंदूर'बाबतची भूमिका आता भारत जगासमोर मांडणार आहे. 'ऑपरेशन सिंदूर'चा संदेश भारत जगात पोहोचवणार आहे. यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळ तयार करण्यात आलं आहे.**


या शिष्टमंडळात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांची देखील निवड करण्यता आली आहे. मात्र, या सर्वपक्षीय शिष्टमंडळासाठी काँग्रेसने शशी थरूर यांच्या नावाऐवजी दुसऱ्या चार खासदारांची नावे दिली होती. पण तरी देखील केंद्र सरकारने शशी थरूर यांच्या नावाची निवड केली. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं. दरम्यान, या सर्व घडामोडींवर आता काँग्रेस नेते शशी थरूर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच काँग्रेसने तुमचं नाव सर्वपक्षीय शिष्टमंडळासाठी न दिल्यामुळे पक्ष तुमचा अपमान करत आहे का? असं विचारलं असता शशी थरूर यांनी दिलखुलास उत्तर दिलं.शशी थरूर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं की, "केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी मला माझ्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवरून शिष्टमंडळाचं नेतृत्व करण्यासाठी आमंत्रित केलं. त्यानंतर मी देखील लगेच होकार दिला. मला यात कोणतंही राजकारण दिसत नाही. माझ्या मते जेव्हा आपलं राष्ट्र असतं तेव्हा राजकारण महत्त्वाचं नसतं", असं शशी थरूर यांनी म्हटलं. या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.तसेच काँग्रेसने सुचवलेल्या कोणत्याही नावांबद्दल आपल्याला कोणतीही माहिती नसल्याचं सांगत हा पक्ष आणि केंद्र सरकारमधील विषय असल्याचंही शशी थरूर यांनी म्हटलं. तसेच जेव्हा सुरुवातीला मंत्री रिजिजू यांनी शिष्टमंडळाचं नेतृत्व करण्यासाठी आमंत्रण देण्याचा फोन मला केला होता.

### दुसऱ्या चार खासदारांची नावे दिली

तेव्हाच आपण आपल्या पक्षाला याबाबतची माहिती दिली होती, असंही त्यांनी स्पष्ट केलं.तसेच 'ऑपरेशन सिंदूर'चा संदेश भारत जगात पोहोचवण्यासाठी केंद्र सरकारने तयार केलेल्या सर्वपक्षीय शिष्टमंडळासाठी काँग्रेसने काही नावे जाहीर केली होती. मात्र, काँग्रेसच्या या यादीत तुमचं नाव नव्हतं. त्यामुळे पक्ष तुमचा अपमान करण्याचा प्रयत्न करत आहे का? असा प्रश्न शशी थरूर यांना पत्रकारांनी विचारला असता थरूर म्हणाले की, 'माझा एवढा सहजपणे अपमान होऊ शकत नाही. मला माझी किंमत माहित आहे. या शिष्टमंडळात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांची देखील निवड करण्यता आली आहे. मात्र, या सर्वपक्षीय शिष्टमंडळासाठी काँग्रेसने शशी थरूर यांच्या नावाऐवजी दुसऱ्या चार खासदारांची नावे दिली.

# चंकी पांडे यांच्यासह अनन्याचा जबरदस्त डान्स

बॉलीवूड मनोरंजन सृष्टीत महत्त्वाचा समजला जाणारा 'झी सिने अवॉर्ड्स' सोहळा १७ मे रोजी मुंबईत पार पडला. यंदा या कार्यक्रमाला कार्तिक आर्यन, तमन्ना भाटिया, राशा थडानी, अनन्या पांडे, क्रिती सेनॉन, रश्मिका मंदाना, विवेक ओबेरॉय असे अनेक सेलिब्रिटी उपस्थित होते. या पुरस्कार सोहळ्यातील INSIDE व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत. 'झी सिने अवॉर्ड्स' सोहळ्यात राशा थडानी, अनन्या पांडे, रश्मिका मंदाना, तमन्ना या अभिनेत्रींनी जबरदस्त डान्स परफॉर्मन्स सादर केले आहेत. अनन्या पांडे या सोहळ्यात तिचे वडील चंकी पांडे यांच्या काही आयकॉनिक गाण्यांवर थिरकली.१९८८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'पाप की दुनिया' या सिनेमात अनन्याचे वडील व अभिनेते चंकी पांडे यांनी महत्त्वाची भूमिका साकारली होती. 'पाप की दुनिया' या सिनेमातील चंकी पांडे यांचं 'मैं तेरा तोता' हे गाणं सर्वत्र सुपरहिट झालं होतं. या गाण्यात चंकी पांडे यांच्याबरोबर अभिनेत्री नीलम झळकली होती. वडिलांच्या याच सुपरहिट गाण्यावर अनन्याने जबरदस्त डान्स केला आहे.लेक अनन्या 'मैं तेरा तोता' या गाण्यावर डान्स करत असताना चंकी पांडे यांनी स्टेजवर एन्ट्री घेतली. यानंतर हे बापलेक एकत्र जबरदस्त डान्स करताना दिसले. अनन्या आणि चंकी पांडे यांना रंगमंचावर एकत्र डान्स करताना पाहून अन्य कलाकारांसह उपस्थित प्रेक्षकांनी एकच जल्लोष केला. सध्या या बापलेकीच्या जबरदस्त डान्सचे व्हिडीओ तुफान व्हायरल होत आहेत.दरम्यान, अनन्या व चंकी पांडे यांना एकत्र डान्स करताना पाहून नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. "स्टेजवर कोणतेही कलाकार नव्हे तर एक बाबा आणि त्यांची मुलगी डान्स करतेय असंच वाटतंय", "चंकी पांडेंची कमाल एनर्जी आहे", "बेस्ट – बापलेकीची जोडी", "दोघांनी अप्रतिम डान्स केलाय", "वॉव हा आजचा बेस्ट व्हिडीओ आहे" अशा कमेंट्स या व्हिडीओवर आल्या आहेत.



## सुंदरी मालिकेत खरातची एन्ट्री

या कार्यक्रमामधून प्रेक्षकांच्या भेटीस येणारी अभिनेत्री वनिता खरात (VANITA KHARAT) ही आता एका नव्या मालिकेमधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. नुकताच 'सुंदरी' (SUNDARI) या मालिकेचा एक प्रोमो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.
या प्रोमोमधील वनिताच्या लूकनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. सुंदरी या मालिकेच्या प्रोमोमध्ये दिसत आहे की, सुंदरी ही साहेब प्लाझा तोडण्याचा आदेश देते. तेवढ्यात वनिता खरातची एन्ट्री होते. काळी साडी, काळी टिकली आणि ऑक्लाइडचे दागिने अशा लूकमध्ये वनिता दिसत आहे. वनिताचा हा लूक पाहिल्यानंतर लक्षात येत आहे की, सुंदरी या मालिकेत ती खलनायिकेची भूमिका साकारत आहे. अनेक नेटकऱ्यांनी कमेंट करुन वनिताला तिच्या या मालिकेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. एका नेटकऱ्यानं कमेंट केली,"मला वाटतं वनिता खरातने अशाच नवनवीन भूमिका साकारायला हरकत नाही . या मलिकेत ती खलनायकाची भूमिका खुप सुंदर साकारणार आहे, असं प्रोमो पाहून कळत आहे." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "फायर है तू" तसेच सुयश टिळक,पृथ्वीक प्रताप, प्रियदर्शिनी इंदलकर यांनी देखील सुंदरी या मालिकेच्या प्रोमोला कमेंट करुन वनिताला तिच्या आगामी मालिकेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. सुंदरी या मालिकेत अभिनेत्री आरती बिराजदार ही प्रमुख भूमिका साकारते. आता सुंदरी या मालिकेत वनिताची एन्ट्री झाल्यानंतर पुढे काय काय घडणार? हे पाहण्यास प्रेक्षक उत्सुक आहेत.

## समुद्र होण्याची माझी इच्छा



बॉलिवूडसह हॉलिवूडवर राज्य केलं आहे. अभिनेत्रीचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणा ठरतो. प्रियंकाने नुकतीच 'जियो मामी मुंबई फिल्म फेस्टिव्हल'मध्ये हजेरी लावली. त्यावेळी तिने तिचं आयुष्य, करिअर, अनुभव यासर्व गोष्टींबद्दल भाष्य केलं. त्यावेळी "मी वाहणारी नदी आहे, एक दिवस समुद्र होण्याची माझी इच्छा आहे", असं प्रियंका म्हणाली. 'जियो मामी मुंबई फिल्म फेस्टिव्हल'दरम्यान प्रियंका चोप्रा म्हणाली,"मला तलावासारखं व्हायचं नाही. मी वाहणारी नदी आहे. एक दिवस समुद्र होण्याची माझी इच्छा आहे". प्रियंकाचा आज जागतिक पातळीवर दबदबा आहे. मिस वर्ल्ड, नॅशनल अॅवॉर्ड विजेती बॉलिवूड अभिनेत्री, हॉलिवूड स्टार, गायिका, निर्माती, लेखिका, उद्योगपती सारख्या विविध क्षेत्रांत प्रियंकाने आपल्या कामाचा झेंडा रोवला आहे.
प्रियंका चोप्रा म्हणाली,"सिनेसृष्टीत पदार्पण करण्याचा निर्णय माझा नव्हता. या क्षेत्रात मला जबरदस्तीने ढकललं गेलं आहे. त्यानंतर सहकलाकारांकडून अभिनय म्हणजे नक्की काय हे मी शिकले आहे. एखाद्या गोष्टीत मी 100% देत असते. दररोज सर्वोत्कृष्ट काम करण्याचा माझा प्रयत्न असतो. यशाचं फळ मिळतचं. दररोज चांगलं काम केल्यास लवकरच तुम्ही यशस्वी व्हाल.". प्रियंका चोप्रा पुढे म्हणाली,"प्रत्येक प्रोजेक्टमध्ये मी खूप मेहनत घेत असते. संहितेवर काम केल्यानंतरच मी सेटवर जाते. कलाकाराचं काम हे अॅक्शन आणि कट्च्या मध्ये सुरू असतं. पण एखाद्या प्रोजेक्टसाठी 200 लोक मेहनत घेत असतात. तुमचा चेहरा फक्त त्यांचं प्रतिनिधित्व करत असतो. त्यामुळे माझा कोणता सिनेमा चालला नाही तर नक्कीच मला वाईट वाटतं". प्रियंका चोप्राला हॉलिवूडमध्येही बॉलिवूडसारखं काम करायचं आहे. ती म्हणते,"हिंदी मनोरंजनसृष्टीत मी 15 वर्षे काम केलं आहे. तर 6-8 हॉलिवूडपटांमध्ये मी झळकले आहे. पण बॉलिवूडमध्ये जसं विविधतापूर्ण काम करता आलं आहे. तसंच मला हॉलिवूडमध्येही करायचं आहे. स्वत:ला चॅलेंज द्यायला मला आवडेल". 'अंदाज' सिनेमाच्या यशानंतर प्रियंका चोप्राने कधीच मागे वळून पाहिलं नाही. प्लॅन,

## 'परि, स्वरा ते कियारा!

करवा चौथ हा एक महत्त्वाचा सण आहे. प्रामुख्याने उत्तर भारतातील विवाहित महिलांद्वारे साजरा केला जातो. करवा चौथ हा सण विवाहित महिलांसाठी अतिशय महत्वाचा असतो. यंदा करवा चौथ हा सण 1 नोव्हेंबरला म्हणजेच उद्या साजरा होणार आहे. सर्व महिला या सणाच्या तयारीला लागल्या आहेत. त्यातच लग्नानंतरचा करवा चौथ हा खुपच खास असतो. आता बी टाऊनमध्येही अशा कही अभिनेत्री आहेत ज्यांनी या वर्षी 2023 मध्ये लग्न केले आहे. या अभिनेत्री आपल्या लग्नांनतरच्या पहिल्या करवा चौथसाठी खूप उत्सुक आहेत. चला तर मग जाणून घेऊया या वर्षी कोणती बॉलिवूड अभिनेत्री आपली पहिली करवा चौथ साजरी करणार आहे. यात पहिल नाव येत ते अभिनेत्री कियारा अडवाणीचे. कियाराने सिद्धार्थ मल्होत्रासोबत फेब्रुवारी 2023 मध्ये लग्न केले आहे. कियारा तिचा पहिला करवा चौथ साजरा करण्यासाठी तयार आहे. 'शेरशाह' चित्रपटाच्या सेटवर दोघांची लव्हस्टोरी सुरु झाली.



## अक्षयने कॉमेडी 'भूत बंगला' बद्दल माहिती दिली

हॉलिवूडची प्रसिद्ध गायिका आणि अभिनेत्री सेलेना गोमेझ नेहमीच तिच्या वैयक्तिक आयुष्य किंवा व्यावसायिक आयुष्यामुळे चर्चेत असते. सेलेना सोशल मिडियावरही चांगलीच सक्रिय असते. ती तिचे फोटो आणि व्हिडिओ चाहत्यांसोबत शेअर करत असते. तिच्या चाहत्यांची संख्या काही कमी नाही. भारतातही तिच्या गाण्यांचा चाहता वर्ग आहे. मात्र आता सेलेनाच्या चाहत्यांसाठी एक वाईट बातमी समोर आली आहे. लोकप्रिय गायिका आणि अभिनेत्री सेलेना गोमेझ सध्या तिच्या एका पोस्टमुळे चर्चेत आहे. तिने तिच्या इंस्टास्टोरीमधून जाहिर केले की ती सोशल मीडियापासून ब्रेक घेत आहे. पण तिने अचानक एवढा मोठा निर्णय का आणि कसा घेतला हे देखील सेलेनाने आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे. सेलेनाने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर लिहिले आहे की, 'मी सोशल मीडियापासून ब्रेक घेत आहे. कारण जगात सुरू असलेली दहशत, द्वेष, हिंसा आणि दहशत पाहून माझे हृदय तुटत आहे. लोकांचा छळ आणि हत्या किंवा कोणत्याही एका समूहाप्रती द्वेषा हे कृत्य भितीदायक आहे. आपण सर्व लोकांचे, विशेषत: लहान मुलांचे रक्षण केले पाहिजे. हा हिंसाचार एकदाचा थांबवावा. माझे शब्द प्रत्येकासाठी किंवा हॅशटॅगसाठी कधीही पुरेसे नसल्यास मला माफ करा. निष्पाप लोकांना दुखापत होताना पाहणं मला सहन होत नाही आहे.

हॉलिवूडची प्रसिद्ध गायिका आणि अभिनेत्री सेलेना गोमेझ नेहमीच तिच्या वैयक्तिक आयुष्य किंवा व्यावसायिक आयुष्यामुळे चर्चेत असते.

# दिल्लीत साईची सुंदर खेळी!

## दिल्लीत दमदार शतकासह गुजरातचा ऐतिहासिक विजय

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आयपीएल २०२५ स्पर्धेत गिल आणि साई सुदर्शनच्या जोडीचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. ही अशी एकमेव जोडी आहे जी फोडण्यासाठी गोलंदाजांना घाम फुटतो. दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध झालेल्या सामन्यातही या जोडीचा बोलबाला पाहायला मिळाला. दिल्लीने गुजरात टायटन्ससमोर विजयासाठी २०० धावांचे आव्हान ठेवले होते. या धावांचा पाठलाग करताना साई सुदर्शनने शानदार शतकी खेळी केली.**



गुजरात टायटन्स संघाला हा सामना जिंकण्यासाठी २०० धावांचे आव्हान होते. दोन्ही संघांसाठी हा सामना अतिशय महत्वाचा होता. त्यामुळे इतका मोठ्या धावांचा डोंगर सर करण्याचा दबाव गुजरात टायटन्स संघावर होता.

मात्र, या दोघांची फलंदाजी पाहून दबाव असल्याचं मुळीच दिसून आलं नाही. दोघांनी दिल्लीच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला.गुजरात टायटन्सने आपल्याला रिटेन का केलं आहे, हे साई सुदर्शनने पहिल्या सामन्यापासून दाखवून दिलं आहे. साई सुदर्शन हा गुजरातच्या मजबूत फलंदाजीचा स्तंभ आहे. हा स्तंभ शेवटपर्यंत टिकून राहतो म्हणून गुजरातला कुठलंही लक्ष्य सहज पूर्ण करण्यात यश येत आहे. दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात गुजरातला २०० धावांचा पाठलाग करायचा होता. हे आव्हान छोटं नव्हतं. पण सुदर्शन शेवटपर्यंत उभा राहिला. त्याने ६१ चेंडूंचा सामना करत १२ चौकार आणि ४ षटकार खेचत १०८ धावांची खेळी केली.

दिल्लीने पहिल्या डावात फलंदाजी करताना १९९ धावा केल्या होत्या. गुजरातला हा सामना जिंकण्यासाठी २०० धावा करायच्या होत्या. संपूर्ण जबाबदारी टॉप ३ फलंदाजांवर होती. दिल्लीला या तिन्ही फलंदाजांना तंबूत पाठवायचं होतं. मात्र दिल्लीचे गोलंदाज सलामी जोडीलाही बाद करू शकले नाहीत. दोघांनी मिळून २०० धावांची भागीदारी केली. यापूर्वी आयपीएलच्या इतिहासात असं कधीच घडलं नव्हतं. गुजरातच्या सलामी जोडीने एकही विकेट न गमावता २०० धावांचा यशस्वी पाठलाग केला.या सामन्यात दिल्लीचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीसाठी मैदानात आला. दिल्लीकडून केएल राहुलची बॅट चांगलीच तळपली. त्याने ६५ चेंडूंचा सामना करत ११२ धावांची खेळी केली.

या खेळीदरम्यान त्याने ४ षटकार आणि १४ चौकार मारले. तर अभिषेक पोरेलने ३० धावा चोपल्या. शेवटी अक्षर पटेलने २५ आणि ट्रिस्टन स्टब्सने २१ धावा करत संघाची धावसंख्या १९९ वर पोहोचवली.साई सुदर्शन आणि शुबमन गिलच्या द्विशतकी भागीदारीच्या जोरावर गुजरात टायटन्सने दिल्लीचा एकतर्फी पराभव केला. गुजरातने एकही विकेट न गमावता हा दणदणीत विजय मिळवला. गुजरातने या एकतर्फी सामन्यात दिल्लीचा १० विकेट्स राखून पराभव केला आहे.

### दिल्लीने केल्या 199 धावा

केएल राहुलने ६५ चेंडूत १४ चौकार आणि ४ षटकारांसह नाबाद ११२ धावा केल्या. तर अभिषेक पोरेल १९ चेंडूत ३० धावा करत बाद झाला. तर अक्षर पटेल आणि स्टब्सने प्रत्येकी २१, २५ धावांची खेळी केली.केएल राहुलने ६५ चेंडूत १४ चौकार आणि ४ षटकारांसह नाबाद ११२ धावा केल्या. तर अभिषेक पोरेल १९ चेंडूत ३० धावा करत बाद झाला. तर अक्षर पटेल आणि स्टब्सने प्रत्येकी २१, २५ धावांची खेळी केली.गुजरात टायटन्स संघ या विजयासाठी पहिल्या स्थानी पोहोचला आहे. तर दुसऱ्या स्थानी आरसीबीचा संघ, तिसऱ्या स्थानी पंजाब किंग्सचा संघ आहे. यासह हे तिन्ही संघ प्लेऑफसाठी क्वालिफाय ठरले आहेत. यासह चौथ्या स्थानासाठी मुंबई इंडियन्स, दिल्ली कॅपिटल्स आणि लखनौ सुपर जायंट्स संघासाठी अटीतटीची लढत होणार आहे. त्यामुळे या तिन्ही संघांचा प्रत्येक सामना महत्त्वाचा असणार आहे.आयपीएल २०२५ स्पर्धेत गिल आणि साई सुदर्शनच्या जोडीचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. ही अशी एकमेव जोडी आहे जी फोडण्यासाठी गोलंदाजांना घाम फुटतो.

# रॉयल्सवर किंग्ज पडले भारी!

## राजस्थानला नमवत पंजाबची प्लेऑफच्या दिशेने वाटचाल

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आयपीएल २०२५ स्पर्धेत आज डबल हेडरचा सामना रंगणार आहे. डबल हेडरचा पहिला सामना राजस्थानच्या होम ग्राऊंडवर पार पडला. राजस्थान रॉयल्स आणि पंजाब किंग्ज या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात पंजाब किंग्जचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात आला होता. प्रथम फलंदाजी करताना पंजाबने २० षटकांअखेर ५ गडी बाद २१९ धावा केल्या होत्या. या धावांचा बचाव करताना पंजाबने १० धावांनी बाजी मारली.**



जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात पंजाब किंग्जने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना पंजाबच्या फलंदाजांनी राजस्थानच्या गोलंदाजांवर चांगलाच हल्लाबोल केला. पंजाबच्या युवा सलामीवीर फलंदाजांना या डावात हवी तशी सुरूवात करता आली नाही. प्रियांश आर्य ९ तर प्रभसिमरन सिंग २१ धावांवर माघारी परतला. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला मिचेल ओवेन शून्यावर माघारी परतला.चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला नेहाल वढेरा गोलंदाजांवर तुटून पडला. त्याने ३७ चेंडूंचा सामना करत ५ चौकार आणि ५ षटकारांच्या साहाय्याने ७० धावांची खेळी केली. तर श्रेयस अय्यरने ३० धावा चोपल्या. शेवटी शशांक सिंगने ५ चौकार आणि ३ षटकारांच्या साहाय्याने ५९ धावा केल्या. या खेळीच्या बळावर पंजाब किंग्जने २० षटकांअखेर ५ गडी बाद २१९ धावा केल्या.राजस्थान रॉयल्सला हा सामना जिंकण्यासाठी २२० धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या राजस्थान रॉयल्सकडून यशस्वी जैस्वालने ५० धावा केल्या. तर वैभव सूर्यवंशीने ४० धावा चोपल्या.संजू सॅमसनने २० धावांची खेळी केली. शेवटी हातून निसटलेला सामना ध्रुव जुरेलने परत आणून दिला. त्याने ५३ धावा करत संघाला विजयाच्या अगदी जवळ पोहोचवलं होतं. मात्र, शेवटी राजस्थानचा संघ विजयापासून १० धावा दूर राहिला. शेवटच्या दोन षटकात राजस्थानचा संघ विजयाच्या अगदी जवळ पोहोचला होता. शेवटच्या १२ चेंडूत राजस्थानला ३० धावा करायच्या होत्या. मात्र,ध्रुव जुरेल बाद झाल्याने राजस्थानचा संघ लक्ष्य गाठण्यात अपयशी ठरला.

### यशस्वी जैस्वालने 50 धावा

शेवटी शशांक सिंगने ५ चौकार आणि ३ षटकारांच्या साहाय्याने ५९ धावा केल्या. या खेळीच्या बळावर पंजाब किंग्जने २० षटकांअखेर ५ गडी बाद २१९ धावा केल्या.राजस्थान रॉयल्सला हा सामना जिंकण्यासाठी २२० धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या राजस्थान रॉयल्सकडून यशस्वी जैस्वालने ५० धावा केल्या.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

ePaper

। सोमवार ।
। दि. 19 मे 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती





ADMISSION OPEN
Moraya Shikshan Sanstha
"यत् भावो – तत् भवति"
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> Basic Java
> Basic Tally
From
26th May 2025
1 Hour /day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
7
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com